# प्रसिद्धिपत्रक

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**
**पुणे-४११००६**

**जा.क्र./पोउआ/वाह/३९१५ /२०२४** **पुणे दिनांक - ०३/०६/२०२४**

पुणे शहरातील हडपसर वाहतूक विभागा अंतर्गत पुणे शहर, पिंपरी चिंचवड, ठाणे, मुंबई परिसरातुन येणा-या व सोलापुर रोडने सोलापुर, मराठवाडा, कर्नाटक, तेलंगणा भागात जाणा-या लक्झरी बसेस प्रवाशी घेण्याकरीता वैभव थिएटर ते रविदर्शन, १५ नं चौक या दरम्यान सोलापुर रोडवर थांबत होत्या त्यामुळे सोलापुर रोडवरती नेहमी वाहतूक कोंडी होत आहे.सदर ठिकाणची वाहतूक कोंडी टाळण्याकरीता तसेच वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी रोहिदास पवार, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, हडपसर वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात दि.०४/०६/२०२४ खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**<u>हडपसर वाहतुक विभाग पुणे अंतर्गत</u>,**

- **पुणे - सोलापुर रोड वरील मगरपट्टा जंक्शन ते शेवाळवाडी पर्यंत सोलापुर रोडचे दोन्ही बाजुस लक्झरी बसेसना नो पार्किंग, नो हॉल्टींग करण्यात येत आहे.**
- **सोलापुर रोडवरती लक्झरी बसेससाठी पी.एम.पी.एम.एल बस डेपो शेवाळेवाडी येथे थांबा देण्यात येत आहे.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे ४११००६ यांचे कार्यालयात दिनांक ०४/०६/२०२४ ते दिनांक – १८/०६/२०२४ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यांवश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

**(रोहिदास पवार)**
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

**प्रति,**

१) **जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

**प्रत :-** २)**सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – २,** पुणे शहर.

३) **पोलीस निरिक्षक, प्रेसरुम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४) **प्रभारी अधिकारी हडपसर** वाहतुक विभाग, पुणे शहर.
२/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार / प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून,**
**त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच अंतिम प्रेसनोट सादर करावी.**

५) **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

६) **पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.